अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती
समाजशास्त्र विभाग

दि. ०५/०३/२०२२

प्रति,
मा. प्राचार्य,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती

विषय: एक दिवसीय उद्योजकता विकास कार्यशाळेचा अहवाल....

महोदय,

उद्योजकता विकास योजने अंतर्गत, आपल्या महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाच्या वतीने उद्योजकता विकास उपक्रमाअंतर्गत " सामाजिक उद्यमशीलता : संधी आणि आव्हाने" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन शनिवार, दि. ०५/०३/२०२२ रोजी करण्यात आले होते.. या कार्यशाळेत मा. रियाज पिरजादे, उद्योजकता सल्लागार, पुणे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. उद्योजक होण्यासाठी समाज आणि पर्यावरण यांचा समतोल कसा साधता येईल या विषयी त्यांनी वेगवेगळ्या उद्योगांच्या उदाहरणावरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच वेगवेगळ्या उद्योगविषयक योजनाची माहिती देऊन महिलांसाठी असलेल्या योजनाची माहिती देण्यात आली. मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांशी विविध प्रश्नावर चर्चा झाली. या कार्यशाळेत पदवी प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष या वर्गातील एकुण ७१ विद्यार्थी सहभागी झाले.

या कार्यशाळेचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. विनायक सुभाष लष्कर यांनी केले. तसेच सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. नितीन राजाराम चव्हाण यांनी केले. या कार्यशाळेचे यशस्वीरीत्या पार पाडण्याकरिता मा. संस्थाचालक, मा. प्राचार्य, सर्व मा. उपप्राचार्य तसेच महाविद्यालयाचे रजिस्ट्रार यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले. धन्यवाद.

कार्यशाळा समन्वयक

प्रा. नितीन चव्हाण

विभागप्रमुख

प्रा. विनायक लष्कर


12:02
" सामाजिक उद्यमशीलता : संधी आणि आव्हाने" कार्यशा...
REC
mukund
Ranjana
Chavan
You
Nisha
Ahad
Avinash
4 others


12:02
" सामाजिक उद्यमशीलता : संधी आणि आव्हाने" कार्यशा...
REC
mukund
Ranjana
Chavan
You
Nisha
Ahad
Avinash
4 others